REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 11 | AUGUST - 2025

# अभ्यासिका ग्रंथालय, जिल्हा भंडारा येथील वाचकांचाअभ्यास

कु. मोना शामभाऊ येवले[1] and डॉ. प्रिन्स अजयकुमार ते.आगाशे[2]
[1]ग्रंथपाल, जे.एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा.
[2]ग्रंथपाल, मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालय, नागपूर.



सारांश :

आजच्या युग हे माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. महाविद्यालय विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याकरिता महाविद्यालयीन ग्रंथालये उपलब्ध असतात परंतु महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना जर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करावयाचा आहे आणि घरी त्यांना सोयउपलब्ध नाही तर त्यांना अभ्यासिका चा वापर करावा लागतो. भंडारा हे एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. आजूबाजूच्या खेड्यातील विद्यार्थी शहरामध्ये शिक्षण घेण्याकरिता येत असतात, त्यामुळे शहरांमध्ये एकूण किती अभ्यासिका आहेत त्यात किती विद्यार्थी अभ्यास करतात. अभ्यासिकेचा खरच विद्यार्थांना फायदा होतो का? या बद्दल व उपयोक्त्याच्या वाचण्याच्या सवयींचा विविध पैलूंचा अभ्यास प्रस्तुत लेखाद्वारे घेण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे.

शब्द् संज्ञा: अभ्यासिका, उपयोक्ता , उपयोक्ता अध्ययन

## प्रस्तावना:

आयुष्याच्या प्रवासात स्वतःची ओळख निर्माण करणे फार महत्त्वाचे असते कारण कोणतीच भाषा, विचार, व्यक्तिमत्व घेऊन माणूस जन्माला येत नाही. संधी सर्वांना समान मिळतात परंतु त्या संधीचं सोनं कसं करायचं हे ज्याचं त्यांने ठरवायचं असतं व या स्पर्धात्मक युगात भरपूर कष्ट, मेहनत करून स्वतःचा ब्रँड स्वतःच विकसित करायचा असतो जर आपल्या ज्ञानावर, बुद्धिमत्तेवर, कौशल्यावर आणि मेहनतीवर आपला विश्वास असेल तर या जगात कोणतीच गोष्ट अशक्य नाही व या सर्वात शिक्षण फार महत्त्वाची भूमिका बजावतात कारण शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. एक अधिकारी होण्याच्या तयारीत जर सुरुवातीलाच शिक्षणामध्ये समाजाचा सहभाग घेतल्यास शिक्षण हे समाजाभिमुख बनण्यास मदत होते व सोबतच मूल्यशिक्षणाची जोड विद्यार्थ्यांना मिळाली तर शिक्षणाची गुणवत्ता वाढण्यासाठी मदत होऊन असे शिक्षण मिळालेला विद्यार्थी प्रशासनात गेल्यावर तो लोकभिमुख कार्य करणारा कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नावलौकिक मिळवितो. अभ्यासिका चा अभ्यास हा जिल्ह्यातील शेक्षणिक प्रगतीस मदत करणारा घटक आहे. या घटकाचा / साधनांचे मुल्यांकन एक प्रयत्न आहे.

## अभ्यासाची उदिष्टे:

1. भंडारा शहरात एकूण किती अभ्यासिका आहेत.
2. **आसन व्यवस्था :** अभ्यासिकेत बसून अभ्यास करण्यासाठीची व्यवस्था कशी आहे.

3. **वेळ :** अभ्यासिकेची वेळ कशी असते . विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार आणि स्पर्धा परीक्षांचे वेळापत्रक पाहून यात वाढीव स्वरूपात बदल करण्यात येतो का?
4. **शुल्क :** अभ्यासिकेत प्रवेश घेण्यासाठी काही शुल्क आकारण्यात येते का दैनिक, आठवडा आणि मासिक असे त्याचे स्वरूप कसे आहे?
5. **कागदपत्रे :** प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी कोणकोणती कागदपत्रे आधार कार्ड, पॅन कार्ड आणि फोटो देणे आवश्यक असतात.
6. **पुस्तके :** विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत बसून अभ्यास करण्यासाठी स्वतःची पुस्तके वापरणे अपेक्षित आहे कि ग्रंथालयामार्फत पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतात.
7. **प्रवेश मर्यादा :** अभ्यासिकेत कॉलेज विद्यार्थी आणि राज्य केंद्र / स्पर्धा परीक्षांना बसलेल्या अश्या कोणत्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो?
8. **क्षमता :** अभ्यासिकेत एकावेळी किती विद्यार्थी बसू शकतील इतके क्षमता आहे?
9. **वाचनाचा कल :** विद्यार्थ्यांचा कल कोणता विषयाशी निगडीत आहे?

**संशोधन पद्धती :**

अभ्यासा करिता भंडारा शहरातील संपूर्ण अभ्यासिकांचा उपयोग करणाऱ्या उपयोक्त्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अभ्यासात उपयोक्त्यांचा वाचनाच्या सवयींचा, त्यांना मिळणाऱ्या सुविधा, येणाऱ्या अडचणी अभ्यास करण्याकरिता 11 प्रश्नांची व्यवस्थित प्रश्नावली तयार केलेली आहे त्यानंतर त्या आधारे माहिती संकलित करण्यात आली होती संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

**तक्ता . 1. भंडारा शहरातील एकूण अभ्यासिका/ग्रंथालय**

| अनु. . | अभ्यासिकेचे नाव / पत्ता | स्थापना वर्ष | संस्थापक |
|---|---|---|---|
| 1. | पोलीस लायब्ररी पोलीस मुख्यालय हेडक्वार्टर | १९८२ | एस.पी. भंडारा पोलीस |
| 2. | ज्ञानदा अभ्यासिका, झेडपी चौक, गणेशपुर | २०२२ | सचिन ठाकरे |
| 3. | ब्रह्मः करियर अकॅडमी , गणेशपूर | - | - |
| 4. | बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र भंडारा सिविल लाईन समाजकल्याण भवन | २०१६ | बाबासाहेब देशमुख सहाय्यक आयुक्त |
| 5. | प्रयास अभ्यासिका, राजीव गांधी चौक | २०२१ | आकाश सिंग |
| 6. | यशश्री अभ्यासिका , हौसिंग बोर्ड कॉलोनी | २०२३ | छाया भोयर |
| 7. | स्व.बाबुराव मेंढे स्मृती वाचनालय खात रोड | २०१९ | सुनील मेंढे |
| 8. | मधुर ग्रंथालय शास्त्री चौक | २०१८ | बुद्ध विहार फौंडेशन ग्रुप |
| 9. | मैत्रेय बुद्ध विहार नाशिकनगर | २०१५ | नगरपरिषद भंडारा |
| 10. | मुस्लिम लायब्ररी स्टडी सेंटर, मुस्लिम लायब्ररी | १९२३ | नाहिमूर रहीम खान |
| 11. | अण्णाजी कुलकर्णी पब्लिक लायब्ररी | २००८ | स्वप्नील येवले |
| 12. | साऊ अभ्यासिका, सहकार नगर | २०२३ | युथ फॉर सोशल जस्टीस ग्रुप |
| 13. | मंगलम लायब्ररी आनंदनगर भोजापूर | २०२३ | मिलिंद भालाधारे |
| 14. | सावित्रीबाई फुले लायब्ररी गणेशपूर | २०२३ | बुद्ध विहार कमिटी |
| 15. | आरंभ अभ्यासिका रंगारी हॉस्पिटल जवळ , राजीव गांधी चौक | - | अविनाश थोटे |
| 16. | विदर्भ लायब्ररी, झेडपी चौक | - | |
| 17. | सार्वजनिक वाचनालय गांधी चौक | १९९० | महा. शासन |
| 18. | जिल्हा ग्रंथालय , शास्त्री चौक | १९५५ | महा. शासन |
| 19. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी, खात रोड | - | |

भंडारा शहरात १९ पेक्षा जास्त अभ्यासिका आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर २०२३ पर्यंत अभ्यासिका ग्रंथालये स्थापन होतच आहेत यावरून अभ्यासिका/ ग्रंथालय यांचे महत्त्व अबाधित आहे.

तक्ता . 2 अभ्यासिकेचे नाव / पत्ता, वेळ, ग्रंथसंख्या, आसन व्यवस्था/ क्षमता

| अनु. | अभ्यासिकेचे नाव / पत्ता | वेळ | ग्रंथसंख्या | आसन व्यवस्था/ क्षमता |
|---|---|---|---|---|
| 1 | पोलीस लायब्ररी पोलीस मुख्यालय हेडक्वार्टर | स.8.00 ते 9.00 रात्री | 1200+ | 80 |
| 2 | ज्ञानदा अभ्यासिका, झेडपी चौक, गणेशपुर | स.7.00 ते 11.00 रात्री | - | 100 |
| 3 | ब्रह्मः करियर अकॅडमी , गणेशपूर | स.8.00 ते 8.00 रात्री | - | 145 |
| 4 | बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र भंडारा सिविल लाईन | स.8.00 ते 8.00 रात्री | 3000+ | 100 |
| 5 | प्रयास अभ्यासिका, राजीव गांधी चौक | स.7.00 ते 10.00 रात्री | - | 66 |
| 6 | यशश्री अभ्यासिका , हौसिंग बोर्ड कॉलोनी | स.7.30 ते 10.00 रात्री | - | 40 |
| 7 | स्व.बाबुराव मेंढे स्मृती वाचनालय खात रोड | स.8.00 ते 8.00 रात्री | 100+ | 45 |
| 8 | मधुर ग्रंथालय शास्त्री चौक | स.7.00 ते 10.00 रात्री | 600+ | 45 |
| 9 | मैत्रेय बुद्ध विहार नाशिकनगर | स.9.00 ते 12.00 रात्री | 1000+ | 40 |
| 10 | मुस्लिम लायब्ररी स्टडी सेंटर, मुस्लिम लायब्ररी | स.8.00 ते 12.00 व 4.00 ते 8.00 रात्री | 27000+ | 50 |
| 11 | अण्णाजी कुलकर्णी पब्लिक लायब्ररी | स.8.00 ते 10.00 रात्री | - | 40 |
| 12 | साऊ अभ्यासिका, सहकार नगर | स.8.00 ते 9.00 रात्री | 450+ | 40 |
| 13 | मंगलम लायब्ररी आनंदनगर भोजापूर | स.8.00 ते 9.00 रात्री | 20+ | 31 |
| 14 | सावित्रीबाई फुले लायब्ररी गणेशपूर | स.5.00 ते 10.00 रात्री | - | 80 |
| 15 | आरंभ अभ्यासिका रंगारी हॉस्पिटल जवळ , राजीव गांधी चौक | स.8.00 ते 10.00 रात्री | - | 50 |
| 16 | विदर्भ लायब्ररी, झेडपी चौक | स.8.00 ते 8.00 रात्री | - | 50 |
| 17 | सार्वजनिक वाचनालय गांधी चौक | स.7.00 ते 11.00 ते 7.30 सायं. | | 50 |
| 18 | जिल्हा ग्रंथालय , शास्त्री चौक | स.9.20 ते 4.00 ते 8.00 सायं. | 84851 | 70 |
| 19 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर लायब्ररी, खात रोड | 24 तास | - | 100 |

## अभ्यासाचे निष्कर्ष:

भंडारा शहरात एकूण अभ्यासिका/ ग्रंथालये 19 पेक्षा जास्त आहेत यात प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते2023 पर्यंत सुद्धा यांची स्थापना वर्ष आहेत. अनेक अभ्यासिका यांच्या कडे आहे स्वतःची ग्रंथालये आहेत. पुस्तके हि विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतात. तर काही ठिकाणीही पुस्तके ठेवलेली नाहीये तर विद्यार्थ्यांना स्वतःचे पुस्तके स्वतः आणायची आहेत. प्रत्येक ग्रंथालयाचे आसन व्यवस्था ही 50 ते 100 पर्यंत अशी वेगवेगळी असून त्यांची वेळ हे सुद्धा वेगवेगळी आहे काही ग्रंथालय24 तास खुले आहे, तर काही ग्रंथालयही सकाळी आठ संध्याकाळी आठ ते काही ग्रंथालयपात्र उशिरापर्यंत सुरू असतात. या अभ्यासिकेमध्ये प्रवेश शुल्क हे नाममात्र घेण्यात येते दोनशे रुपये महिना ते पाचशे रुपये पर्यंत शुल्क आकारण्यात येते. काही ठिकाणी शुल्क आठवड्याचे किंवा मासिक स्वरूपात जमा करावे लागते. एका (दिवसाचे : . १००/- साप्ताहिक : . ४००/- एका महिन्याचे : . १०००/- (१ तारखेपासून ३० तारखेपर्यंत महिना) शुल्क हे अगदीच नाममात्र आहे हे ते विषय उल्लेखनीय बाब आहे अभ्यासिकेत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार कार्ड, पॅन कार्ड आणि

फोटो हे जमा केलेले असतात त्याचप्रमाणे काही शकत विद्यार्थी स्वतःचे पुस्तक हे वापरतात किंवा काही अभ्यासिका ही ग्रंथालयामार्फत पुस्तके उपलब्ध करून देतात. प्रत्येक ग्रंथालयात बसणारे विद्यार्थी हे कोणत्या ना कोणत्या स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करणारे विद्यार्थी असतात आणि ते त्यांना स्वतंत्र असा वेळ मिळावा याकरिता अभ्यासिका चा वापर करत असतात. अभ्यासातून असे आढळून आले कि 86% विद्यार्थी स्पर्धा परीक्षेकरिता अभ्यासिकेचा वापर करतात . 4% विद्यार्थी हे महाविद्यालयीन आहेत. सार्वजनिक वाचनालय, मुस्लीम लायब्ररी आणि जिल्हा ग्रंथालयात 8% जेष्ठ नागरिक ग्रंथालयाचा वापर वर्तमानपत्र वाचन व पुस्तके वाचनाकरिता करतात.

## संदर्भ :


- सर्व अभ्यासिका / व ग्रंथपाल/ वाचक यांच्याकडून प्रत्यक्ष माहिती